Test Booklet Code & Serial No. **D**

प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

# Paper-II

# POLITICAL SCIENCE

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................

(Name) ................................................

2. (Signature) ........................................

(Name) ................................................

Seat No. | | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | | |

(To be filled by the Candidate)

# APR - 15224

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **48** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.

   **Example :** where (C) is the correct response.

   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   - (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.

   **उदा.** : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.

   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

# Political Science

## Paper II

## राजनीति विज्ञान

## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. In which of the following Act British Government declared that its objective is the gradual introduction of responsible government in India ?

(A) Government of India Act of 1858

(B) Government of India Act of 1909

(C) Government of India Act of 1919

(D) Government of India Act of 1935

1. भारतामध्ये जबाबदार शासनाची हळूहळू ओळख करून देणे हे ब्रिटीश सरकारचे उद्दिष्ट आहे. हे खालीलपैकी कोणत्या कायद्याद्वारे प्रथमच घोषित केले ?

(A) 1858 चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट

(B) 1909 चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट

(C) 1919 चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट

(D) 1935 चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट

2. Match the following correctly :

**Name of Province**

(*a*) Bombay

(*b*) Madras

(*c*) Bihar

(*d*) West Bengal

**No. of Members in the Constituent Assembly**

(1) 19

(2) 49

(3) 21

(4) 36

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (1) | (2) | (3) |
| (B) | (1) | (2) | (3) | (4) |
| (C) | (3) | (2) | (1) | (4) |
| (D) | (3) | (2) | (4) | (1) |

2. योग्य जोड्या जुळवा :

**प्रांताचे नाव**

(*a*) बॉम्बे

(*b*) मद्रास

(*c*) बिहार

(*d*) पश्चिम बंगाल

**संविधान सभेमधील सदस्य संख्या**

(1) 19

(2) 49

(3) 21

(4) 36

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (1) | (2) | (3) |
| (B) | (1) | (2) | (3) | (4) |
| (C) | (3) | (2) | (1) | (4) |
| (D) | (3) | (2) | (4) | (1) |

3. The principle of "Procedure established by Law" which is related to judicial review in the Indian Constitution is adopted from which country's Constitution ?

(A) American Constitution

(B) Japanese Constitution

(C) British Constitution

(D) Canadian Constitution

4. Which part of the Indian Constitution deals with the powers of Parliament to amend the Constitution and its procedure ?

(A) Part X

(B) Part XV

(C) Part XX

(D) Part XIX

3. ''कायद्याने स्थापित कार्यपद्धती'' हे न्यायालयीन पुनर्विलोकनासंबंधी असणारे तत्त्व भारतीय राज्यघटनेत कोणत्या देशाच्या राज्यघटनेवरून घेतले आहे ?

(A) अमेरिकन राज्यघटना

(B) जपानची राज्यघटना

(C) ब्रिटीश राज्यघटना

(D) कॅनडाची राज्यघटना

4. भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या भागामध्ये संसदेच्या संविधानात सुधारणा करण्याचा अधिकार व त्यासंबंधीची कार्यपद्धती यांचा समावेश केला आहे ?

(A) भाग दहा

(B) भाग पंधरा

(C) भाग वीस

(D) भाग एकोणीस

5. Which of the following statements is not correct about President of India ?

(*a*) The President of India is vested with Power Pocket Veto

(*b*) The President of India is vested with Power Qualified Veto

(*c*) The President of India is vested with Power Suspensive Veto

(*d*) The President of India is vested with Power Absolute Veto

**Codes :**

(A) Only (*c*)

(B) Only (*d*)

(C) Only (*b*)

(D) Only (*a*)

6. Who appoints Chairman of all Parliamentary Committees of the Lok Sabha ?

(A) Prime Minister

(B) President

(C) Vice President

(D) Speaker of the Lok Sabha

5. भारताच्या राष्ट्रपतीविषयी खालीलपैकी कोणता विधान चुकीचा आहे ?

(*a*) भारताच्या राष्ट्रपतींना पॉकेट व्हेटोचा अधिकार आहे

(*b*) भारताच्या राष्ट्रपतींना क्वालिफायड/गुणात्मक व्हेटोचा अधिकार आहे

(*c*) भारताच्या राष्ट्रपतींना सस्पेन्सीव/तात्पुरता व्हेटोचा अधिकार आहे

(*d*) भारताच्या राष्ट्रपतींना अबसुल्युट/निरंकुश व्हेटोचा अधिकार आहे

**संकेतांक :**

(A) फक्त (*c*)

(B) फक्त (*d*)

(C) फक्त (*b*)

(D) फक्त (*a*)

6. लोकसभेच्या सर्व संसदीय समित्यांच्या अध्यक्षांची नेमणूक कोण करतात ?

(A) पंतप्रधान

(B) राष्ट्रपती

(C) उपराष्ट्रपती

(D) लोकसभेचे सभापती

7. Which Supreme Court Judge propounded the principle of "Public Interest Litigation" in India ?

(A) Justice S.M. Sikri

(B) Justice P.N. Bhagavati

(C) Justice Koka Subbarao

(D) Justice Mudholkar

8. In which Article of the Indian Constitution there is provision of Abolition or creation of Legislative Councils in States ?

(A) Article 169

(B) Article 170

(C) Article 171

(D) Article 172

9. Who appoints the Chairperson of the State Human Rights Commission ?

(A) President

(B) Supreme Court Chief Justice

(C) Governor

(D) Prime Minister

7. भारतामध्ये जनहित याचिका हे तत्त्व कोणत्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी प्रतिपादित केले ?

(A) न्यायमूर्ती एस. एम. सिक्री

(B) न्यायमूर्ती पी. एन. भगवती

(C) न्यायमूर्ती कोका सुब्बाराव

(D) न्यायमूर्ती मुधोळकर

8. राज्यामध्ये विधान परिषद विसर्जित करणे किंवा निर्माण करणे याबाबतची तरतूद भारतीय राज्यघटनेमध्ये कोणत्या कलमामध्ये करण्यात आलेली आहे ?

(A) कलम 169

(B) कलम 170

(C) कलम 171

(D) कलम 172

9. राज्य मानव अधिकार आयोगाच्या अध्यक्षाची नेमणूक कोण करतात ?

(A) राष्ट्रपती

(B) सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश

(C) राज्यपाल

(D) पंतप्रधान

10. Who is the Chairman of the Metropolitan Planning Committee ?
    (A) Mayor
    (B) Chief Minister
    (C) Commissioner of Municipal Corporation
    (D) Minister of Urban Development Ministry

10. महानगर नियोजन समितीचे अध्यक्ष कोण असतात ?
    (A) महापौर
    (B) मुख्यमंत्री
    (C) महानगरपालिका आयुक्त
    (D) शहर विकास खात्याचे मंत्री

11. Which of the following Commissions is related with India's planning and development ?
    (A) NITI Aayog and Union Public Service Commission
    (B) Planning Commission and NITI Aayog
    (C) Finance Commission and State Re-organisation Commission
    (D) Backward Class Commission and Backward Caste Commission

11. खालीलपैकी कोणते आयोग भारताच्या नियोजन आणि विकास याबाबतचा आहे ?
    (A) नीती आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोग
    (B) नियोजन आयोग आणि नीती आयोग
    (C) वित्त आयोग आणि राज्य पुनर्रचना आयोग
    (D) मागासवर्ग आयोग आणि मागास जात आयोग

12. Who was the proponent of 'Congress system' ?
    (A) Pandit Nehru
    (B) Rajni Kothari
    (C) Indira Gandhi
    (D) Rajeev Gandhi

13. Which demand was made by Bombay Plan before Constitution Assembly about planning and development ?
    (A) State stays neutral about economy
    (B) State should faith only in capitalism
    (C) State take initiative for industrial and other development
    (D) State should be abolish and established stateless society

12. कॉंग्रेस व्यवस्था या संकल्पनेचा प्रणेता कोण आहे ?
    (A) पंडित नेहरू
    (B) रजनी कोठारी
    (C) इंदिरा गांधी
    (D) राजीव गांधी

13. नियोजन आणि विकासासंदर्भात बॉम्बे प्लॅनद्वारे घटनासमितीकडे कोणती मागणी करण्यात आली ?
    (A) राज्याने अर्थव्यवस्थेबाबत तटस्थ राहावे
    (B) राज्याने फक्त भांडवलशाहीवर विश्वास ठेवावा
    (C) राज्याने औद्योगिक आणि इतर विकासा-बाबत पुढाकार घ्यावा
    (D) राज्य नष्ट करावे व राज्यविहीन समाज प्रस्थापित करावा

14. Which is one of the objective of the first five year plan ?
    (A) Implementation of higher education in rural area
    (B) Industrial revolution is state's first priority
    (C) Implementation of agriculture and industrial policy
    (D) Get the country's economy out of the cycle of poverty

14. पहिल्या पंचवार्षिक योजनेचे एक उद्दिष्ट हे ही होते :
    (A) उच्च शिक्षण धोरणाची ग्रामीण भागात अंमलबजावणी करणे
    (B) औद्योगिक क्रांती हे राज्याचे पहिले उद्दिष्ट आहे
    (C) शेती आणि उद्योग धोरणाची अंमल-बजावणी करणे
    (D) देशाला गरिबीच्या वेढ्यातून बाहेर काढणे

15. Who was the architech of Second Five Year Plan ?
    (A) Lal Bahadur Shastri
    (B) P.C. Mahalnobis
    (C) P.C. Alexander
    (D) Droupadi Murmu

15. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे शिल्पकार कोण होते ?
    (A) लालबहादूर शास्त्री
    (B) पी.सी. महालनोबीस
    (C) पी.सी. ॲलेक्झांडर
    (D) द्रौपदी मुर्मू

16. Choose the correct answer about Congress party which declared that socialist pattern of society was its goal ?

(A) New Delhi - 1947

(B) Madras (Aawdi) - 1956

(C) Mumbai - 1960

(D) Bangalore - 1972

17. **Statement (A) :** Initially, India's economy is described as 'Mixed Economy'.

**Statement (B) :** Elements from both capitalist as well as socialist model was adopted.

(A) Statement (A) is false and statement (B) is not a right explanation of (A)

(B) Statement (A) is correct and statement (B) is right explanation

(C) Statement (A) and statement (B) both are false

(D) Statement (A) is false and statement (B) is correct answer of (A)

16. काँग्रेसने समाजासाठी समाजवादी आकृतिबंध हे आपले उद्दिष्ट म्हणून स्वीकारले. यासंदर्भात योग्य पर्याय निवडा :

(A) नवी दिल्ली - 1947

(B) मद्रास (आवडी) - 1956

(C) मुंबई - 1960

(D) बंगलोर - 1972

17. **विधान (A) :** सुरुवातीला भारताच्या अर्थव्यवस्थेचे वर्णन मिश्र अर्थव्यवस्था असे केले गेले.

**विधान (B) :** भांडवली आणि समाजवादी दोन्ही आकृतिबंधातील घटक स्वीकारण्यात आले.

(A) विधान (A) चुकीचे आहे व विधान (B) त्याचे योग्य स्पष्टीकरण नाही

(B) विधान (A) योग्य आहे व विधान (B) त्याचे योग्य स्पष्टीकरण आहे

(C) विधान (A) आणि विधान (B) दोन्हीही चुकीचे आहे

(D) विधान (A) चुकीचे आहे व (B) हे (A) चे योग्य उत्तर आहे

18. Choose the incorrect answer about political party and their existing President :

| | **Political Party** | | **President** |
|---|---|---|---|
| (A) | Congress Party | (*i*) | Mallikarjun Kharge |
| (B) | Bhartiya Janata Party | (*ii*) | J.P. Nadda |
| (C) | Babujan Samaj Party | (*iii*) | Mayawati |
| (D) | Telugu Desam Party | (*iv*) | YRS Rajshekhar Reddy |

18. राजकीय पक्ष आणि त्यांचे अध्यक्ष यातील अयोग्य उत्तर ओळखा :

| | **राजकीय पक्ष** | | **अध्यक्ष** |
|---|---|---|---|
| (A) | काँग्रेस पक्ष | (*i*) | मल्लिकार्जुन खरगे |
| (B) | भारतीय जनता पक्ष | (*ii*) | जे.पी. नड्डा |
| (C) | बहुजन समाज पक्ष | (*iii*) | मायावती |
| (D) | तेलगू देसम | (*iv*) | वाय. आर. एस. राजशेखर रेड्डी |

19. Who was the proponent of 'Non-Congressism' strategy in Indian Politics ?
    (A) Rahul Gandhi
    (B) Indira Gandhi
    (C) Mahatma Gandhi
    (D) Dr. Ram Manohar Lohia

19. 'बिगर काँग्रेसवाद' या रणनीतीचे उद्गाते कोण होते ?
    (A) राहुल गांधी
    (B) इंदिरा गांधी
    (C) महात्मा गांधी
    (D) डॉ. राममनोहर लोहिया

20. Which political party secure majority first time in India in 21st centuary ?
    (A) Telugu Desam
    (B) Bhartiya Janata Party
    (C) D.M.K.
    (D) Y.R.S. Congress

20. कोणत्या राजकीय पक्षाने 21व्या शतकात पहिल्यांदा बहुमत प्राप्त केले ?
    (A) तेलगू देसम
    (B) भारतीय जनता पक्ष
    (C) द.मु.क.
    (D) वाय.आर.एस. काँग्रेस

21. Who among the following has called development administration as, 'an action-oriented, goal-oriented administrative system' ?
    (A) F.W. Riggs
    (B) Robert Chambers
    (C) Edward Weidner
    (D) Robert Dahl

21. खालीलपैकी कोणी विकास प्रशासनाला 'कृतिभिमुख, ध्येयाभिमुख प्रशासकीय यंत्रणा' असे संबोधले आहे ?
    (A) एफ. डब्ल्यू. रिग्ज
    (B) रॉबर्ट चेंबर्स
    (C) एडवर्ड वेडनर
    (D) रॉबर्ट डहाल

22. Who among the following developed the model of 'Administrative Man' ?

(A) Chester Barnard

(B) Abraham Maslow

(C) Douglas Mcgregor

(D) Herbert Simon

22. खालीलपैकी कोणी 'प्रशासकीय माणूस' हे प्रारूप विकसित केले ?

(A) चेस्टर बर्नार्ड

(B) अब्राहम मास्लो

(C) डग्लस मॅकग्रेगर

(D) हर्बर्ट सायमन

23. Which among the following thinkers is associated an interaction between administrative system and their environment ?

(A) F.W. Riggs

(B) Max Weber

(C) Karl Marx

(D) Herbert Simon

23. खालीलपैकी कोणता विचारवंत प्रशासकीय व्यवस्था आणि त्यांचे वातावरण यांच्यातील परस्परसंवादाशी संबंधित आहे ?

(A) एफ. डब्ल्यू. रिग्ज

(B) मॅक्स वेबर

(C) कार्ल मार्क्स

(D) हर्बर्ट सायमन

24. Who among the following is considered as the father of administrative management theory ?

(A) Herbert Simon

(B) Chester Barnard

(C) Henry Fayol

(D) Luther Gulick

25. The word 'public' in Public Administration stands for ............ .

(A) Private Corporations

(B) Government

(C) Market

(D) Civil Society

26. Which ideology champions the cause of free market ?

(A) Communitarianism

(B) Socialism

(C) New Right

(D) New Left

24. खालीलपैकी कोणाला प्रशासकीय व्यवस्थापन सिद्धांताचे जनक मानले जाते ?

(A) हर्बर्ट सायमन

(B) चेस्टर बर्नार्ड

(C) हेन्री फेयोल

(D) ल्यूथर गुलिक

25. सार्वजनिक प्रशासनातील 'सार्वजनिक' शब्दाचा अर्थ म्हणजे ..................

(A) खासगी महामंडळे

(B) सरकार

(C) बाजार

(D) नागरी संस्था

26. कोणती विचारधारा मुक्त बाजारपेठेला कारणीभूत ठरते ?

(A) साम्यवाद

(B) समाजवाद

(C) नवीन अधिकार

(D) नवीन डावे

27. Who among the following has invented the technique 'Management by Objective' ?

(A) M.P. Follet

(B) Chester Barnard

(C) Abraham Maslow

(D) Peter F. Drucker

28. 'Creative Experience' (1924) is the book written by :

(A) Herbert Simon

(B) Luther Gulick

(C) M.P. Follett

(D) Chester Barnard

29. Who among the following considered New Public Management as 'marriage of opposites' ?

(A) David Osbone

(B) Christopher Hood

(C) Shireen Lateef

(D) Camilla Stivers

27. खालीलपैकी कोणी 'उद्दिष्टानुसार व्यवस्थापन', तंत्राचा शोध लावला आहे ?

(A) एम. पी. फॉलेट

(B) चेस्टर बर्नार्ड

(C) अब्राहम मास्लो

(D) पीटर एफ. ड्रकर

28. 'क्रिएटीव्ह एक्सपिरियन्स' (1924) हे पुस्तक कोणी लिहिले ?

(A) हर्बर्ट सायमन

(B) ल्यूथर गुलिक

(C) एम.पी. फॉलेट

(D) चेस्टर बर्नार्ड

29. खालीलपैकी कोणी नवीन सार्वजनिक व्यवस्थापनाला 'विरोधकांचा करार' मानले ?

(A) डेव्हिड ओसबोन

(B) ख्रिस्तोफर हूड

(C) शिरीन लतीफ

(D) कॅमिला स्टिव्हर्स

30. Who among the following is the editor of the book 'Toward a New Public Administration' ?

(A) Frank Marini

(B) Dwight Waldo

(C) H. George Fredrickson

(D) Mark Bevir

31. Which of the following writ is issued to compel an authority to do his duties or exercise his/her powers ?

(A) Writ of Habeas Corpus

(B) Writ of Mandamus

(C) Writ of Certiorari

(D) Writ of Prohibition

30. खालीलपैकी 'टूवर्ड अ न्यु पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन' या पुस्तकाचे संपादक कोण आहेत ?

(A) फ्रँक मारिनी

(B) ड्वाइट वाल्डो

(C) एच. जार्ज फ्रेड्रिक्सन

(D) मार्क बेवीर

31. अधिकाऱ्याला त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी किंवा त्यांच्या अधिकाराचा वापर करण्यास भाग पाडण्यासाठी खालीलपैकी कोणता आदेश जारी केला जातो ?

(A) बंदिप्रत्यक्षीकरण

(B) परमादेश

(C) उत्प्रेक्षण

(D) प्रतिषेध

32. Who is called the father of modern local self-government bodies in India ?

(A) Lord Ripon

(B) Lord Canning

(C) Lord Lytton

(D) Lord Hardings

32. भारतातील आधुनिक स्थानिक स्वराज्य संस्थांचे जनक कोणाला म्हटले जाते ?

(A) लॉर्ड रिपन

(B) लॉर्ड कॅनिंग

(C) लॉर्ड लिटन

(D) लॉर्ड हार्डिंग्ज

33. Which of the following is/are nature of the public policy ?

(1) Public policies are goal oriented

(2) Public policy is formulated without any purpose

(3) Public policy deals with private company

(A) (1) only

(B) (2) only

(C) (3) only

(D) (2) and (3) only

33. खालीलपैकी कोणते सार्वजनिक धोरणाचे स्वरूप आहे/आहेत ?

(1) सार्वजनिक धोरणे ध्येयाभिमुख असतात

(2) सार्वजनिक धोरण कोणत्याही उद्देशाशिवाय तयार केले जाते

(3) सार्वजनिक धोरण हे खाजगी कंपनीशी संबंधित आहे

(A) फक्त (1)

(B) फक्त (2)

(C) फक्त (3)

(D) फक्त (2) आणि (3)

34. Choose the correct option regarding elements of Good Governance :

(1) Transparency

(2) Accountability

(3) Participation

(4) Responsiveness

(A) (1), (2), (3) only

(B) (1), (2), (4) only

(C) (1), (3), (4) only

(D) (1), (2), (3), (4) only

35. Which of the following pairs is not correctly matched ?

(A) Pradhan Mantri Awas Yojana – Rich People

(B) Pradhan Mantri Awas Yojana – Urban Poor

(C) Pradhan Mantri Awas Yojana – Rural Poor

(D) Pradhan Mantri Awas Yojana – Rural and Urban Poor

34. गुड गव्हर्नन्सच्या घटकांबाबत योग्य पर्याय निवडा :

(1) पारदर्शकता

(2) जबाबदारी

(3) सहभाग

(4) प्रतिसाद

(A) (1), (2), (3) फक्त

(B) (1), (2), (4) फक्त

(C) (1), (3), (4) फक्त

(D) (1), (2), (3), (4) फक्त

35. खालीलपैकी कोणती जोडी बरोबर जुळवलेली नाही ?

(A) प्रधानमंत्री आवास योजना – श्रीमंत लोक

(B) प्रधानमंत्री आवास योजना – शहरी गरीब

(C) प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण गरीब

(D) प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण आणि शहरी गरीब

36. What plays a fundamental role in implementing corporate social responsibility ?

(A) Social Audit

(B) Income Tax Department

(C) Public Accounts Committee

(D) Central Bureau of Investigation

37. Which factor is interaction that ties the state to civil society ?

(A) Military

(B) Guerilla War

(C) Authoritarian Leadership

(D) Governance

38. Which among the following is not regional development policies ?

(A) Development of backward regions

(B) Industrial location

(C) Urban growth

(D) Nationalization of industries

36. कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीची अंमलबजावणी करण्यात कोणाची मूलभूत भूमिका आहे ?

(A) सामाजिक लेखापरीक्षण (अंकेक्षण)

(B) आयकर विभाग

(C) लोक लेखा समिती

(D) केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग

37. राज्याला नागरी समाजाशी जोडणारा परस्परसंवादी घटक कोणता आहे ?

(A) सैनिक

(B) गुरिल्ला युद्ध

(C) सर्वांकष नेतृत्व

(D) शासन व्यवहार

38. खालीलपैकी कोणते प्रादेशिक विकास धोरण नाही ?

(A) मागास प्रदेशाचा विकास

(B) औद्योगिक क्षेत्र

(C) शहराची वाढ

(D) उद्योगांचे राष्ट्रीयीकरण

39. Which section of the National Rural Employment Guarantee Act, 2005 (NREGA) provides for regular "Social Audit" ?
    (A) Section 15
    (B) Section 16
    (C) Section 17
    (D) Section 18

39. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, 2005 (NREGA) च्या कोणत्या भागात नियमित सामाजिक अंकेक्षणाची तरतूद आहे ?
    (A) भाग 15
    (B) भाग 16
    (C) भाग 17
    (D) भाग 18

40. Which is the first state in India to establish the office of Lokayukta ?
    (A) Maharashtra
    (B) Odisha
    (C) Tamil Nadu
    (D) Kerala

40. लोकायुक्त कार्यालयाची स्थापना करणारे भारतातील पहिले राज्य कोणते ?
    (A) महाराष्ट्र
    (B) ओडिशा
    (C) तामिळनाडू
    (D) केरळ

41. The declaration that he would rather be 'Socrates dissatisfied than a fool satisfied' was made by :

(A) L.T. Hobhouse

(B) J.A. Hobson

(C) T.H. Green

(D) John Stuart Mill

41. 'तो समाधानी मूर्ख असण्यापेक्षा असमाधानी सॉक्रेटीस असणे पसंत करेल' ही घोषणा कोणी केली होती ?

(A) एल.टी. हॉबहाऊस

(B) जे.ए. हॉब्सन

(C) टी. एच. ग्रीन

(D) जॉन स्टुअर्ट मिल

42. Who among the following thinkers characterized early liberalism as 'possessive individualism' ?

(A) Jeremy Bentham

(B) C.B. Macpherson

(C) Milton Friedman

(D) T.H. Green

42. खालीलपैकी कोण विचारवंतांनी सुरुवातीच्या उदारमतवादाला 'स्वतत्त्ववादी व्यक्तिवाद' म्हणून ओळखले ?

(A) जेरेमी बेंथम

(B) सी.बी. मॅकफरसन

(C) मिल्टन फ्रीडमन

(D) टी.एच. ग्रीन

43. The statement 'Over himself, Over his own body and mind, the individual is sovereign' is associated with :

(A) Thomas Hobbes

(B) Machel Oakeshott

(C) John Stuart Mill

(D) Benjamin Disraeli

44. Classical liberalism is usually associated with the work of :

(A) J.S. Mill

(B) Jeremy Waldron

(C) John Locke

(D) John Rawls

45. In whose words the state is regarded as, 'necessary evil' ?

(A) Thomas Paine

(B) John Locke

(C) Georgi Plekhanov

(D) William Morris

43. 'स्वत:वर, स्वत:च्या शरीरावर आणि मनावर, व्यक्तीचे सार्वभौम असते' हे विधान खालील गोष्टींशी संबंधित आहे :

(A) थॉमस हॉब्स

(B) माचेल ओकेशॉट

(C) जॉन स्टुअर्ट मिल

(D) बेंजामिन डिझरायली

44. अभिजात उदारमतवाद सर्वसामान्यपणे खालील कार्याशी संबंधित आहे :

(A) जे. एस. मिल

(B) जेरेमी वाल्ड्रॉन

(C) जॉन लॉक

(D) जॉन रॉल्स

45. कोणाच्या शब्दात राज्याला 'आवश्यक आपत्ती' असे संबोधले जाते ?

(A) थॉमस पेन

(B) जॉन लॉक

(C) जॉर्जी प्लेखानोव्ह

(D) विल्यम मॉरिस

46. The book 'The Feminine Mistique' is written by ................ .

(A) Betty Friedan

(B) Kate Millett

(C) Marie Curie

(D) Emma Goldman

47. Who among the following thinker claim that the basic political contradiction in modern society is between 'man as citizen' and 'man as private individual' ?

(A) J.S. Mill

(B) Karl Marx

(C) Will Kymlicka

(D) Nathan Glazer

46. 'द फेमिनाइन मिस्टिक' हे पुस्तक ............ यांनी लिहिले आहे.

(A) बेटी फ्रीडन

(B) केट मिलेट

(C) मारी क्यूरी

(D) एम्मा गोल्डमन

47. कोणता राजकीय विचारवंत असे प्रतिपादित करतो की माणून : एक नागरिक आणि माणूस : एक खाजगी व्यक्ती यांच्यात राजकीय विरोधाभास आहे ?

(A) जे.एस. मिल

(B) कार्ल मार्क्स

(C) विल किमलिका

(D) नॅथन ग्लेझर

48. The idea that individuals are absolute owners of their talents and capacities was revived by :

(A) Robert Nozick

(B) John Rawls

(C) Adam Smith

(D) Lenin

49. Who among the following thinkers is considered as Socialist Feminist ?

(A) Kate Millet

(B) Max Weber

(C) Friedrich Engels

(D) Betty Friedan

50. Who among the following thinkers called civil society the 'aggregate sphere of interest' ?

(A) G.W.F. Hegel

(B) John Locke

(C) Charles Fourier

(D) Robert Putnam

48. व्यक्ती त्यांच्या प्रतिभेची आणि क्षमतेची पूर्णत: मालक आहेत ही कल्पना कोणी पुनरुज्जीवित केली ?

(A) रॉबर्ट नोझिक

(B) जॉन रॉल्स

(C) ॲडम स्मिथ

(D) लेनिन

49. खालीलपैकी कोणाला समाजवादी स्त्रीवादी मानले जाते ?

(A) केट मिल्लेट

(B) मॅक्स वेबर

(C) फ्रेडरिक एंगेल्स

(D) बेटी फ्रीडन

50. खालीलपैकी कोण विचारवंत नागरी समाजाला 'हितसंबंधांचे एकूण क्षेत्र' असे म्हणतात ?

(A) जी.डब्ल्यू.एफ. हेगेल

(B) जॉन लॉक

(C) चार्ल्स फोरियर

(D) रॉबर्ट पुटनाम

51. According to Hegel, what is the connection between the ethical life of individuals and the State in his political philosophy ?

(A) The State has no bearing on the ethical life of individuals

(B) Ethical life is only achievable in isolation from societal structures

(C) The ethical life of individuals is integrally connected to the life of the State

(D) Hegel dismisses the concept of ethical life in political contexts

52. In Gramscian theory, what does the concept of "war of position" refer to ?

(A) Open military conflict between classes

(B) The struggle for ideological dominance and control over civil society

(C) Revolutionary uprising

(D) Economic determinism

51. हेगेलच्या राजकीय तत्त्वज्ञानात, व्यक्तींचे नैतिक जीवन आणि राज्य यांच्यात काय संबंध आहे ?

(A) राज्याचा व्यक्तींच्या नैतिक जीवनावर कोणताही परिणाम होत नाही

(B) नैतिक जीवन सामाजिक संरचनापासून अलिप्त राहण्यामुळेच शक्य आहे

(C) व्यक्तींचे नैतिक जीवन, राज्याच्या जीवनाशी अविभाज्यपणे जोडलेले असते

(D) हेगेलने राजकीय संदर्भातील नैतिक जीवनाची संकल्पना नाकारली

52. ग्रामसियन सिद्धांतामध्ये, ''स्थितीचे युद्ध'' या संकल्पनेचा संदर्भ काय आहे ?

(A) वर्गांमधील खुला लष्करी संघर्ष

(B) नागरी समाजावर वैचारिक वर्चस्व आणि नियंत्रणासाठी संघर्ष

(C) क्रांतिकारी उठाव

(D) आर्थिक निर्धारवाद

53. What concept in Frantz Fanon's political thought emphasizes the psychological impact of colonialism on the colonized individual ?

(A) Economic Determinism

(B) Cultural Relativism

(C) Alienation and Dehumanization

(D) Historical Materialism

54. Hannah Arendt's concept of "the banality of evil" is associated with :

(A) Machiavelli's political realism

(B) Aristotle's virtue ethics

(C) Eichmann's role in the Holocaust

(D) Rousseau's social contract

55. Who said, " I do not wish them (women) to have power over men, but over themselves" ?

(A) Simon De Bouvoir

(B) Shullamith Firestone

(C) Mary Wollstonecraft

(D) Kate Millet

53. फ्रांत्झ फॅनॉनच्या राजकीय विचारातील कोणती संकल्पना वसाहतवादाचा वासाहतिक मानवीवर होणाऱ्या मानसिक परिणामावर भर देते ?

(A) आर्थिक निर्धारवाद

(B) सांस्कृतिक सापेक्षतावाद

(C) परात्मभाव आणि अमानवीकरण

(D) ऐतिहासिक भौतिकवाद

54. हाना आरएन्डची ''दुरितांचे क्षुद्रत्व'' ही संकल्पना कशाशी संबंधित आहे ?

(A) मॅकियावेलीचा राजकीय वास्तववाद

(B) ॲरिस्टॉटलचे सद्गुण नीतिशास्त्र

(C) होलोकॉस्टमध्ये आयशमनची भूमिका

(D) रूसोचा सामाजिक करार

55. ''त्यांनी (स्त्रियांनी) पुरुषांवर अधिकार ठेवावा अशी माझी इच्छा नाही, तर स्वत:वर अधिकार ठेवावा'' असे कोण म्हणाले ?

(A) सिमोन दे बुव्हा

(B) शुलामिथ फायरस्टोन

(C) मेरी वॉलस्टोनक्राफ्ट

(D) केट मिलेट

56. 'The "natural" man will be one in whom strong conscience and steadfast reason have successfully harmonized self-love and sympathy'. Who advocated this ?

(A) Hobbes

(B) Rousseau

(C) Bentham

(D) Locke

57. According to Confucius, which concept emphasizes the importance of individuals fulfilling their roles and responsibilities within the social hierarchy ?

(A) Tian

(B) Dao

(C) Xiao

(D) Li

56. ' ''नैसर्गिक'' माणूस असा असेल ज्यामध्ये प्रखर सद्सद्विवेकबुद्धी आणि शाश्वत तर्क यामुळे आत्म-प्रेम आणि सहानुभूती यांच्यात यशस्वीपणे सुसंवाद घडवून जातो', हे प्रतिपादन कोणी केले ?

(A) हॉब्स

(B) रूसो

(C) बेंथम

(D) लॉक

57. सामाजिक पदानुक्रमातील भूमिका आणि जबाबदाऱ्या व्यक्तींनी पार पाडण्याचे महत्त्व कन्फ्यूशियसच्या, कोणत्या संकल्पनेमध्ये विशद केले गेले ?

(A) टियान

(B) डाओ

(C) जिओ

(D) ली

58. Which book of Machiavelli discusses the idea of Virtue in the context of ruler ?

(A) The Art of War

(B) Two treatise on government

(C) Perfect state

(D) Fortuna

59. According to John Locke, which amongst the following is not a natural right ?

(A) Right to Life

(B) Right to Property

(C) Right to Liberty

(D) Right to Work

60. Who said, "Each person possesses an inviolability founded on justice that even the welfare of society as a whole cannot override" ?

(A) John Rawls

(B) Robert Nozick

(C) Friedrich Hayek

(D) Habermas

58. मॅकियाव्हेलीच्या कोणत्या पुस्तकात राज्यकर्त्याच्या संदर्भात गुणांची चर्चा करण्यात आली आहे ?

(A) द आर्ट ऑफ वॉर

(B) टू ट्रिटिस ऑन गव्हर्नमेंट

(C) पर्फेक्ट स्टेट

(D) फॉर्च्युना

59. जॉन लॉकच्यामते, खालीलपैकी कोणता नैसर्गिक अधिकार नाही ?

(A) जगण्याचा अधिकार

(B) मालमत्तेचा अधिकार

(C) स्वातंत्र्याचा अधिकार

(D) कामकरण्याचा अधिकार

60. ''प्रत्येक व्यक्तीमध्ये न्यायावर आधारित अभेद्यता असते की अगदी संपूर्ण समाजाचे कल्याणही त्यापेक्षा वरचढ ठरू शकत नाही'' असे कोण म्हणाले ?

(A) जॉन रॉल्स

(B) रॉबर्ट नोझिक

(C) फ्रेडरिक हायेक

(D) हेबरमास

61. Who wrote the book 'The Home and The World' ?

(A) Jawaharlal Nehru

(B) Rabindranath Tagore

(C) M. K. Gandhi

(D) Ram Manohar Lohia

62. Who among the following was the founder of the 'Arya Mahila Samaj' and 'Sharda Sadan' ?

(A) Swami Vivekananda

(B) Pandita Ramabai

(C) Swami Dayanand Saraswati

(D) Sri Aurobindo

63. Who is the author of the book 'Guilty Men of India's Partition' ?

(A) Dr. B. R. Ambedkar

(B) V.D. Savarkar

(C) Jaiprakash Narayan

(D) Ram Manohar Lohiya

61. 'द होम अँड द वर्ल्ड'' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) जवाहरलाल नेहरू

(B) रवींद्रनाथ टागोर

(C) एम.के. गांधी

(D) राम मनोहर लोहिया

62. खालीलपैकी कोण 'आर्य महिला समाज' आणि 'शारदा सदन' या संस्थांचे संस्थापक होते ?

(A) स्वामी विवेकानंद

(B) पंडिता रमाबाई

(C) स्वामी दयानंद सरस्वती

(D) श्री अरविंद

63. 'भारतीय फाळणीचे गुन्हेगार' या ग्रंथाचे लेखक कोण आहेत ?

(A) डॉ. बी.आर. आंबेडकर

(B) वि.दा. सावरकर

(C) जयप्रकाश नारायण

(D) राम मनोहर लोहिया

64. Match the following lists of thinkers and their political concept. Choose your answer using the codes given below :

**List I**

(*a*) M.K. Gandhi

(*b*) Jawaharlal Nehru

(*c*) M. N. Roy

(*d*) Din Dayal Upadhyaya

**List II**

(1) Panchsheel

(2) Integral Humanism

(3) Trusteeship

(4) Radical Humanism

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (3) | (1) | (4) | (2) |
| (B) | (3) | (1) | (2) | (4) |
| (C) | (2) | (1) | (4) | (3) |
| (D) | (1) | (3) | (4) | (2) |

64. खाली दिलेल्या यादीतील विचारवंत आणि त्यांच्या राजकीय संकल्पना यांच्या योग्य जोड्या लावा. खाली दिलेल्या संकेत सूचीमधून बरोबर उत्तर निवडा :

**यादी I**

(*a*) एम.के. गांधी

(*b*) जवाहरलाल नेहरू

(*c*) एम.एन. रॉय

(*d*) दीनदयाल उपाध्याय

**यादी II**

(1) पंचशील

(2) एकात्म मानवतावाद

(3) विश्वस्त संकल्पना

(4) मुलग्राही मानवतावाद

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (3) | (1) | (4) | (2) |
| (B) | (3) | (1) | (2) | (4) |
| (C) | (2) | (1) | (4) | (3) |
| (D) | (1) | (3) | (4) | (2) |



[P.T.O.

65. Who among the following thinkers established the organisation 'Abhinav Bharat' ?
   (A) Swami Vivekananda
   (B) V.D. Savarkar
   (C) Shri Aurobindo
   (D) Rabindranath Tagore

66. Which one of the following options was not a part of Bal Gangadhar Tilak 'Four Point Programme' ?
   (A) Swadeshi
   (B) Ganesh festival
   (C) Boycott
   (D) National Education

67. Which of the following thinkers was associated with 'Self Respect Movement' ?
   (A) Jayaprakash Narayan
   (B) E.V. Ramasamy
   (C) V.D. Savarkar
   (D) Shri Aurobindo

65. खालीलपैकी कोणत्या विचारवंताने 'अभिनव भारत' ही संघटना स्थापन केली ?
   (A) स्वामी विवेकानंद
   (B) वि.दा. सावरकर
   (C) श्री अरविंद
   (D) रवींद्रनाथ टागोर

66. बाळ गंगाधर टिळक यांच्या 'चतु:सूत्री' कार्यक्रमात खालीलपैकी कशाचा समावेश नव्हता ?
   (A) स्वदेशी
   (B) गणेशोत्सव
   (C) बहिष्कार
   (D) राष्ट्रीय शिक्षण

67. खालीलपैकी कोणता विचारवंत 'आत्म-सन्मान चळवळी'शी संबंधित आहे ?
   (A) जयप्रकाश नारायण
   (B) ई.व्ही. रामसामी
   (C) वि.दा. सावरकर
   (D) श्री अरविंद

68. Which of the following political thought was proposed by the thinker Kautilya ?

(A) Saptang Theory

(B) Four Pillar State

(C) Panchsheel Doctrine

(D) Seven Fold Revolution

69. Which of the following pairs is incorrectly matched ?

(A) Jaiprakash Narayan - Why Socialism

(B) Ram Manohar Lohia - Marx, Gandhi and Socialism

(C) Shri Aurobindo - The Mother

(D) V.D. Savarkar - Essays on Geeta

68. खालीलपैकी कौटिल्य या विचारवंताने मांडलेला राजकीय विचार कोणता आहे ?

(A) सप्तांग सिद्धांत

(B) चौखांबा राज्य

(C) पंचशील धोरण

(D) सप्तक्रांती

69. खालीलपैकी कोणती जोडी अयोग्य जुळवली आहे ?

(A) जयप्रकाश नारायण – व्हाय सोशॅलिझम

(B) राम मनोहर लोहिया – मार्क्स, गांधी अँड सोशॅलिझम

(C) श्री अरविंद – द मदर

(D) वि.दा. सावरकर – एसेज ऑन गीता

70. Match the following lists of thinkers and their respective political parties :

**List I**

(*a*) Dr. B.R. Ambedkar

(*b*) Jawaharlal Nehru

(*c*) E.V. Ramasamy

(*d*) M.N. Roy

**List II**

(1) Indian National Congress

(2) Independent Labour Party

(3) Communist Party of India

(4) Justice Party

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (1) | (4) | (3) |
| (B) | (4) | (1) | (2) | (3) |
| (C) | (2) | (1) | (3) | (4) |
| (D) | (4) | (1) | (3) | (2) |

70. खाली दिलेल्या दोन याद्यांमधील विचारवंत व त्यांचे राजकीय पक्ष यांच्या योग्य जोड्या लावा :

**यादी I**

(*a*) डॉ. बी.आर. आंबेडकर

(*b*) जवाहरलाल नेहरू

(*c*) ई.व्ही. रामसामी

(*d*) एम.एन. रॉय

**यादी II**

(1) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

(2) स्वतंत्र मजूर पक्ष

(3) भारतीय कम्युनिस्ट पक्ष

(4) जस्टीस पार्टी

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (1) | (4) | (3) |
| (B) | (4) | (1) | (2) | (3) |
| (C) | (2) | (1) | (3) | (4) |
| (D) | (4) | (1) | (3) | (2) |

71. Identify the incorrect statement :

(A) Politics and economics are tied to each other

(B) The type of economy adopted by any state is essential in comparative political analysis

(C) After globalization economies of states have witnessed sea change

(D) World system theory is not related to world's capitalist system

72. Which country had maximum number of colonies in Latin America ?

(A) Spain

(B) Portugal

(C) France

(D) Britain

71. चुकीचे विधान ओळखा :

(A) राजकारण आणि अर्थकारण हे एकमेकांशी जोडलेले आहेत

(B) तुलनात्मक राजकीय विश्लेषणामध्ये कोणत्याही राज्याने कोणत्या प्रकारच्या अर्थव्यवस्थेचा अवलंब केला त्याचे विश्लेषण करणे आवश्यक असते

(C) जागतिकीकरणानंतर राज्यांच्या अर्थव्यवस्थां-मध्ये मोठा बदल झाला आहे

(D) जागतिक व्यवस्था सिद्धांत जगाच्या भांडवलशाही व्यवस्थेशी संबंधित नाही

72. लॅटिन अमेरिकेत कोणत्या देशात सर्वाधिक वसाहती होत्या ?

(A) स्पेन

(B) पोर्तुगाल

(C) फ्रान्स

(D) ब्रिटेन

73. What was the biggest challenge before African Nationalism ?

(A) Linguistic

(B) Economic

(C) Tribal

(D) Religious

74. Which of the following is not the feature of globalization ?

(A) Restricted Trade

(B) Liberalization

(C) Free flow of knowledge and technology

(D) Free flow of investment across border

75. Through 1973 Constitution of Pakistan which form of Government was introduced ?

(A) Presidential

(B) Parliamentary

(C) Semi-Presidential

(D) Autocratic

73. आफ्रिकन राष्ट्रवादापुढे सर्वात मोठे आव्हान कोणते होते ?

(A) भाषिक

(B) आर्थिक

(C) आदिवासींचे

(D) धार्मिक

74. खालीलपैकी कोणते जागतिकीकरणाचे वैशिष्ट्य नाही ?

(A) प्रतिबंधित व्यापार

(B) उदारीकरण

(C) ज्ञान आणि तंत्रज्ञानाचा मुक्त प्रवाह

(D) सीमेपलीकडे गुंतवणुकीचा मुक्त प्रवाह

75. 1973 च्या पाकिस्तानच्या राज्यघटनेद्वारे कोणत्या प्रकारचे सरकार अस्तित्वात आले ?

(A) अध्यक्षीय

(B) संसदीय

(C) निम्न अध्यक्षीय

(D) निरंकुश

76. Who is considered the father of American Constitution ?

(A) James Madison

(B) Abraham Lincoln

(C) George Washington

(D) Thomas Jefferson

76. अमेरिकन राज्यघटनेचे जनक कोणाला म्हटले जाते ?

(A) जेम्स मेडीसेन

(B) अब्राहम लिंकन

(C) जॉर्ज वॉशिंगटन

(D) थॉमस जेफेर्सोन

77. Who declared Emergency in Bangladesh on 25th January 1975 ?

(A) Yahya Khan

(B) Sheikh Mujibur Rehman

(C) Zahurul Haq

(D) Mufti Ahmed

77. 25 जानेवारी 1975 रोजी बांगलादेशात आणीबाणी कोणी घोषित केली ?

(A) याह्या खान

(B) शेख मुजीबुर रेहमान

(C) झुहुरुल हक्

(D) मुफ्ती अहमद

78. Why did the theory of modernization emerged ?

(A) To guide the developing countries about their development

(B) Providing loan to developing countries

(C) Giving economic support to the developing countries

(D) To give lessons of politics to the developing countries

78. आधुनिकीकरणाचे सिद्धांत का उदयाला आले ?

(A) विकसनशील देशांना विकासाबाबत मार्गदर्शन करणे

(B) विकसनशील देशांना कर्ज पुरवणे

(C) विकसनशील देशांना आर्थिक मदत करणे

(D) विकसनशील देशांना राजकारणाचे धडे देणे

79. Who believed that democracies have dominance of elite class ?

(A) S.M. Lipset

(B) Vilfred Pareto

(C) C.B. Macpherson

(D) Samuel Huntington

79. लोकशाहीमध्ये अभिजन वर्गाचे वर्चस्व असते असे कोणी म्हटले ?

(A) एस. एम. लिपसेट

(B) विल्फ्रेड पॅरेटो

(C) सी. बी. मॅकफरसन

(D) सॅम्युअल हंटिंग्टन

80. Democratic centralism is the feature of which Political Party ?

(A) Democratic Party

(B) Chinese Communist Party

(C) Conservative Party

(D) Indian National Congress

80. लोकशाही केंद्रीकरण हे कोणत्या राजकीय पक्षाचे वैशिष्ट्य आहे ?

(A) डेमोक्रॅटिक पक्ष

(B) चिनी कम्युनिस्ट पक्ष

(C) कंझर्व्हेटिव्ह पक्ष

(D) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

81. In which theory has Michael Foucault proposed to draw attention to the relationship between power and thought patterns ?

(A) Feminism

(B) Post-Modernism

(C) Structural Theory

(D) Realist Theory

81. मायकल फूकॉल्ट यांनी सत्ता आणि विचारांच्या पद्धतीमधील संबंधांकडे लक्ष वेधण्यसाठी कोणता सिद्धान्त मांडला ?

(A) स्त्रीवाद

(B) उत्तर-आधुनिकतावाद

(C) रचनावादी सिद्धांत

(D) वास्तववादी सिद्धांत

82. Social movements grew after 1990. They are not caused by which of the following factors ?

(A) Globalization has created new opportunities and development in various fields

(B) Increased economic and social inequality. So there was a need to oppose all of them

(C) Anti-globalization, anti-capitalist or global justice movements began to be included

(D) After 1990, less participation of people in decision-making process, emphasis on centralization trend

82. 1990 नंतर सामाजिक चळवळींमध्ये वाढ झाली. त्याला खालीलपैकी कोणता घटक कारणीभूत नाही ?

(A) जागतिकीकरणामुळे नवीन संधी उपलब्ध झाल्या आणि विविध क्षेत्रात विकास झाला

(B) आर्थिक आणि सामाजिक असमानता यांत वाढ झाली. त्यामुळे या सर्वांना विरोध करण्याची आवश्यकता निर्माण झाली

(C) जागतिकीकरण विरोधी, भांडवलशाही विरोधी किंवा जागतिक न्यायासाठी होणाऱ्या चळवळींचा समावेश होऊ लागला

(D) 1990 नंतर निर्णय प्रक्रियेत लोकांचा कमी सहभाग, केंद्रीकरण प्रवृत्तीवर भर दिला

83. When did the United Nations announce the Women's Decade ?

(A) 1976-1985

(B) 1975-1985

(C) 1995-2005

(D) 1985-1995

84. Which conferences of NAM was held in Venezuala in 2015 ?

(A) 17th

(B) 15th

(C) 16th

(D) 9th

85. Blue economy is related in which sector ?

(A) Land

(B) Minerals

(C) Marine

(D) Oil

83. संयुक्त राष्ट्र संघाने महिला दशक कधी जाहीर केले ?

(A) 1976-1985

(B) 1975-1985

(C) 1995-2005

(D) 1985-1995

84. व्हेनेझुएला येथे 2015 ला नामची कितवी परिषद भरली होती ?

(A) 17वी

(B) 15वी

(C) 16वी

(D) 9वी

85. ब्लू इकॉनॉमी हे क्षेत्र कशाशी संबंधित आहे ?

(A) भूभाग

(B) खनिज

(C) समुद्र

(D) तेल

86. Which US President announced the Star War program ?

(A) Carter

(B) Clinton

(C) Nixon

(D) Reagan

87. **Statement (A) :** The main issue in international politics is the inability of the world political system to solve the problems arising from globalization.

**Reason (R) :** The Westphalian system has failed to satisfy long-term holdings.

**Codes :**

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are correct, but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is correct, but (R) is wrong

(D) (A) is wrong, but (R) is correct

86. स्टार वॉर कार्यक्रमाची घोषणा करणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष कोण आहेत ?

(A) कार्टर

(B) क्लिंटन

(C) निक्सन

(D) रेगन

87. **विधान (A) :** आंतरराष्ट्रीय राजकारणातील मुख्य मुद्दा म्हणजे जागतिकीकरणामुळे उद्भवलेल्या समस्यांचे निराकरण करण्यात जागतिक राजकीय व्यवस्थेची असमर्थता.

**कारण (R) :** वेस्टफेलीयाप्रणाली दीर्घकालीन उद्दिष्टे पूर्ण करण्यात अयशस्वी ठरली आहे.

**संकेतांक :**

(A) (A) आणि (R) दोन्ही सत्य आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, परंतु (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे, पण (R) हे चुकीचा आहे

(D) (A) चूक आहे, पण (R) हे बरोबर आहे

88. Arrange the conferences in their chronological order under North-South Dialogue.

(1) Cancun Conference

(2) Brant Commission

(3) Paris Conference

(4) Uruguay Talks

**Codes :**

(A) (1), (2), (3), (4)

(B) (3), (2), (1), (4)

(C) (4), (3), (2), (1)

(D) (3), (2), (4), (1)

89. "A change is taking place; Asia is again recognizing its identity." Whose statement is this ?

(A) Pt. Jawaharlal Nehru

(B) Smt. Indira Gandhi

(C) Shri. Rajiv Gandhi

(D) Shri Chandrashekhar

88. उत्तर-दक्षिण संवादाच्या परिषदा काळानुसार क्रम सांगा :

(1) कानकुन परिषद

(2) ब्रान्ट परिषद

(3) पॅरिस परिषद

(4) उरुग्वे वार्ता

**संकेतांक :**

(A) (1), (2), (3), (4)

(B) (3), (2), (1), (4)

(C) (4), (3), (2), (1)

(D) (3), (2), (4), (1)

89. ''बदल होत आहे, आशिया पुन्हा आपली ओळख प्राप्त करत आहे.'' हे विधान कोणाचे आहे ?

(A) पं. जवाहरलाल नेहरू

(B) श्रीमती इंदिरा गांधी

(C) श्री राजीव गांधी

(D) श्री चंद्रशेखर

90. 'Promotion of international peace and security' has been enshrined in whose Constitution ?

(A) People's Republic of China

(B) France

(C) India

(D) America

91. These are the major features of Indian foreign policy :

(*i*) Mutual cooperation

(*ii*) Peaceful cooperation

(*iii*) Expansionism

(*iv*) Respect for mutual sovereignty

(A) (*i*), (*ii*), (*iii*)

(B) (*i*), (*iii*), (*iv*)

(C) (*i*), (*ii*), (*iii*), (*iv*)

(D) (*i*), (*ii*), (*iv*)

90. 'आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेचा प्रचार' हे कोणाच्या राज्यघटनेत नमूद केले आहे ?

(A) पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना

(B) फ्रान्स

(C) भारत

(D) अमेरिका

91. भारतीय परराष्ट्र धोरणाची ही ठळक वैशिष्ट्ये आहेत :

(*i*) परस्पर सहकार्य

(*ii*) शांततामय सहकार्य

(*iii*) विस्तारवाद

(*iv*) परस्पर सार्वभौमत्वाचा आदर

(A) (*i*), (*ii*), (*iii*)

(B) (*i*), (*iii*), (*iv*)

(C) (*i*), (*ii*), (*iii*), (*iv*)

(D) (*i*), (*ii*), (*iv*)

92. In which year was Panchsheel Agreement signed ?

(A) 1951

(B) 1952

(C) 1953

(D) 1954

93. Agreement 123 is related with ......... .

(A) Indo-USA Civil Nuclear Deal

(B) Indo-Russia Civil Nuclear Deal

(C) Indo-USA Arms Deal

(D) Indo-Russia Arms Deal

94. The book 'The India Way' is written by ................. .

(A) Harsh V. Pant

(B) C. Rajamohan

(C) Shashi Tharoor

(D) S. Jaishankar

92. पंचशील करारावर कोणत्या वर्षी स्वाक्षरी झाली ?

(A) 1951

(B) 1952

(C) 1953

(D) 1954

93. करार 123 हा याच्याशी संबंधित आहे :

(A) इंडो-यूएसए नागरी आण्विक करार

(B) इंडो-रशिया नागरी आण्विक करार

(C) इंडो-यूएसए शस्त्र करार

(D) इंडो-रशिया शस्त्र करार

94. 'द इंडिया वे' हे पुस्तक ............... यांनी लिहिले आहे.

(A) हर्ष व्ही. पंत

(B) सी. राजामोहन

(C) शशी थरूर

(D) एस. जयशंकर

95. Match List I with List II and select the correct answer from the codes given below :

**List I**

(*a*) Deng Xiaoping

(*b*) Mikhail Gorbachev

(*c*) Harry Truman

(*d*) Golda Meir

**List II**

(1) USA

(2) USSR

(3) Israel

(4) China

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (2) | (3) | (4) |
| (B) | (4) | (2) | (1) | (3) |
| (C) | (3) | (4) | (2) | (1) |
| (D) | (2) | (1) | (4) | (3) |

95. यादी I ला यादी II शी जुळवा आणि खालील संकेतांकामधून योग्य उत्तर निवडा :

**यादी I**

(*a*) डेंग झियाओपिंग

(*b*) मिखाईल गोर्बाचेव्ह

(*c*) हॅरी टुमन

(*d*) गोल्डा मीर

**यादी II**

(1) संयुक्त राज्य

(2) युएसएसआर

(3) इस्रायल

(4) चीन

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (2) | (3) | (4) |
| (B) | (4) | (2) | (1) | (3) |
| (C) | (3) | (4) | (2) | (1) |
| (D) | (2) | (1) | (4) | (3) |

96. Which of the following countries is not a member of QUAD ?

(A) South Korea

(B) USA

(C) Japan

(D) Australia

97. Choose the incorrect statement regarding India's role in UN :

(A) India is a strong supporter of UN efforts for protection of human rights

(B) India has actively supported peacekeeping activities of the UN

(C) India is the largest donor of UNDP

(D) India has played consistently positive role in the UN's efforts for disarmament and arms control

96. खालीलपैकी कोणता देश QUAD चा सदस्य नाही ?

(A) दक्षिण कोरिया

(B) संयुक्त राज्य अमेरिका

(C) जपान

(D) ऑस्ट्रेलिया

97. यूएनमध्ये भारताच्या भूमिकेबाबत चुकीचे विधान निवडा :

(A) मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्राच्या प्रयत्नांचा भारत खंबीर समर्थक आहे

(B) भारताने संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतता अभियानांना सक्रिय पाठिंबा दिला आहे

(C) भारत हा यूएनडीपीचा सर्वात मोठा देणगीदार आहे

(D) नि:शस्त्रीकरण आणि शस्त्रास्त्र नियंत्रणासाठी संयुक्त राष्ट्रांच्या प्रयत्नांमध्ये भारताने सातत्याने सकारात्मक भूमिका बजावली आहे

98. The first nuclear arms control measures that India accepted was the :

(A) NPT of 1967

(B) SALT-1 of 1972

(C) PTBT of 1963

(D) CTBT of 1995

99. New development bank has been established under which organisation ?

(A) BRICS

(B) SCO

(C) QUAD

(D) SAARC

100. ASEAN stands for ................. .

(A) Association of South-East Asian Nations

(B) Association of Asian South-East Nation-State

(C) Association of South-East American Nations

(D) Association of South-East and North

98. भारताने स्वीकारलेला पहिला अण्वस्त्र नियंत्रण उपाय म्हणजे :

(A) 1967 चा एनपीटी

(B) 1972 चा सॉल्ट-1

(C) 1963 चा पीटीबीटी

(D) 1995 चा सिटीबीटी

99. न्यू डेव्हलपमेंट बँक कोणत्या संघटनेच्या अंतर्गत स्थापन करण्यात आली आहे ?

(A) ब्रिक्स

(B) स्को

(C) क्वाड

(D) सार्क

100. ASEAN चे पूर्ण रूप काय आहे ?

(A) दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रांची संघटना

(B) दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्र-राज्याची संघटना

(C) दक्षिण-पूर्व अमेरिकन राष्ट्रांची संघटना

(D) दक्षिण-पूर्व आणि उत्तर संघटना

## ROUGH WORK